राजपत्रित अधिका-यानी मुख्यालय
सोडण्यास परवानगी घेण्याबाबत.

परिवहन आयुक्त कार्यालय,
४ था मजला, प्रशासकीय इमारत,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.

परिपत्रक - क्र. 392 /सं-४६०४/का.८(५)/जा.क्र. 95228 दि.

संदर्भ :- (१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ७२/सं.४६९८/का८(५) जा.क्र.६८६० दि.४.६.१९९८.
(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ७५/का.८/९८/जा.क्र. ७०३९ दि.११.६.१९९८

## परिपत्रक

माझ्या असे निदर्शनास आले आहे की, या विभागातील राजपत्रित अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालयास येताना विहीत प्राधिकारी / विभाग प्रमुख यांची पूर्व परवानगी न घेता येत असतात. परिणामी प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. प्रादेशिक / कार्यालय प्रमुख यांनी विनापरवानगी मुख्यालयास गैरहजर असणे अतिशय गंभीर आहे. सबब या विभागाच्या सर्व राजपत्रित अधिकारी यांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(१) या विभागातील सर्व राजपत्रित अधिकारी यांनी माझी पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये व विनाकारण या कार्यालयात येऊ नये.
(२) अपवादात्मक परिस्थितीत वरीलप्रमाणे पूर्व परवानगी घेणे शक्य न झाल्यास संबंधितांनी अपर /सह परिवहन आयुक्त किंवा परिवहन उप आयुक्त (प्रशासन) यांची परवानगी घ्यावी.
(३) सर्व प्रादेशिक /जिल्हास्तरावरील कार्यालय प्रमुख तसेच अन्य राजपत्रित अधिकारी यांनी दौ-यावर किंवा रजेवर जाताना विहीत प्राधिकां-याची मुख्यालय सोडण्यास परवानगी घ्यावी व कायार्लयीन कामाची पर्यायी व्यवस्था करावी.

सदरहू सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
(१) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.
(२) परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व नियंत्रक अधिकारी.

*

राजपत्रित अधिका-यांच्या रजा
<u>मंजुरीबाबत</u>

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१

परिपत्रक क्र : 22 /रजा ०१/का ८(५)/रापअग/०५/जाक्र २७२० दिनांक 25 FEB 2005

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सं ४६९५/का ८(१)/जाक्र २४४४९,दि.२५.१२.१९९५

२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सं ४६९७/का ८(५)/जाक्र ७१६३,दि.२६.०६.१९९७

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सं ४६९८/का ८(५)/जाक्र ५८४५,दि.०८.०५.१९९८

४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सं ४६२००१/का ८(५)/रजा/रापअ/२००१/जाक्र १०४६१ दि.२४.०८.२००१

५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ९०/सं.४६०४/कं.८(५)/जा.क्र. १७३५८, दिनाक ३.१२.२००४.

## <u>प रि प त्र क.</u>

निम्नस्वाक्षरीकारांचे असे निदर्शनास आले आहे की, विभागातील राजपत्रित अधिकारी अर्जित रजेवर जाण्यापूर्वी वेळीच विहित नमुना रजा अर्ज सादर करत नाहीत. तसेच रजा अर्ज आयत्यावेळी फॅक्सद्वारा किंवा रजेवरुन परत आल्यानंतर सादर करतात. काहीवेळेस रजा मंजूर करुन न घेता परस्पर कार्यभार हस्तांतरण करुन रजेवर जातात. ही बाब शिस्तीस बाधा आणणारी आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी वर्ग-एक चे अधिकारी हे प्रादेशिक विभाग प्रमुख यांचेमार्फत अर्जित रजा अर्ज सादर न करता थेट अर्ज सादर करतात. परिणामी रजा मंजूर करताना प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. रजा सुरु होण्यापूर्वी रजा मंजूरीचे आदेश निर्गमित करण्यास विलंब होतो.

तरी वरील बाबी टाळण्यासाठी पुढील सुचना देण्यात येत आहेत.

(१) प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अर्जित रजेवर जाण्यापूर्वी रजा सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी किमान ३ आठवडे अगोदर अर्जित रजा मंजूरीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव या कार्यालयास पोहोचेल <u>अशा बेताने</u> सादर करावा.

(२) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांचे प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचेमार्फतच अर्जित रजेचे प्रस्ताव सादर करावेत व प्रादेशिक विभाग प्रमुखाने प्राप्त प्रस्ताव विनाविलंब या कार्यालयास शिफारशीसह सादर करावेत.

(३) रजेचे प्रस्ताव सादर करताना संबंधित अधिका-याचा बिनचूक रजा लेखा तसेच रजा काळातील पर्यायी व्यवस्था याबाबतही स्पष्ट शिफारस करावी.

(४) रजा उपभोगून कर्तव्यार्थ रुजू झाल्यानंतर रुजू अहवाल व वैद्यकीय कारणास्तव रजा असल्यास वैद्यकीय प्रमाणपत्रासह रुजू अहवाल सादर करावा.

(५) काही अत्यावश्यक आणि अपवादात्मक परिस्थितीत पूर्वपरवानगी घेणे शक्य न झाल्यास संबंधितांनी दूरध्वनीवरुन परिवहन उप आयुक्त (प्रशासन) यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच याबाबत लेखी कळविणेही अत्यावश्यक आहे.

(६) नैमित्तिक रजाही पूर्व परवानगीनेच घेण्यात याव्यात.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे अन्यथा संबंधितांची रजा मंजूर करण्यात येणार नाही याची सर्व कार्यालयप्रमुखांनी नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
परिवहन उप आयुक्त(प्रशासन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) मा. परिवहन आयुक्त यांना माहितीसाठी सादर.

२) मा. अपर परिवहन आयुक्त यांना माहितीसाठी सादर.

३) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना माहितीसाठी

४) सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी.

C:\preeti\order\36

परिवहन आयुक्त कार्यालय
प्रशासकीय इमारत, ३ रा / ४ था मजला
शासकीय वसाहत, वांद्रे (पु), मुंबई-५१

परिपत्रक क्र.संकीर्ण २००५/पआ/जसंअ/ममाअ/जाक्र. ३९३३ दिनांक - २

वाचा - १) माहिती अधिकार अधिनियम २००५.
२) प.आ.कार्यालयाचा आदेश क्र.२८४/संकीर्ण ४६०५/का.८(१)/कंमाअ/०५/जाक्र. १२७३६, दिनांक - ११/१०/२००५.

## प रि प त्र क

केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार क्र.२ येथील संदर्भीय कार्यालयीन आदेशान्वये परिवहन आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी, तसेच सहाय्यक माहिती अधिकारी तसेच अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जावरील कार्यवाहीबाबत प्रस्तुत परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे तपशीलवार सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) कार्यालयात प्राप्त अर्जाची नोंद जनसंपर्क अधिकारी कक्षामध्ये एकाच रजिस्टरमध्ये घेण्यात यावी जेणेकरुन प्राप्त अर्ज / प्रलंबित प्रकरणे / पहिले अपील / माहिती आयुक्तांकडील दुसरे अपील व त्याबाबतच्या नोंदी जिल्हाधिकारी /शासनास पाठविणे शक्य होईल.

२) परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासनांनी संबंधित माहिती अधिकाऱ्यांच्या आदेशाने व स्वाक्षरीने अर्जदारास विहित मुदतीत व विहित पध्दतीने उत्तरादाखल माहितीची कार्यवाही पूर्ण करुन शुल्क स्विकारुन परस्पर माहिती पाठवावी. त्याची एक प्रत जनसंपर्क कक्षास नोंद घेण्याकरिता द्यावी व नस्ती जतन करावी.

३) अर्जात मागविलेली माहिती एकापेक्षा जास्त विषयांची असल्यास व सदर माहिती दोन अधिकाऱ्यां- च्या कार्यकक्षेत येत असल्यास, सर्व माहिती अधिकारी उप आयुक्त दर्जाचे असल्याने याबाबत अंतिम निर्णयार्थ प्रकरण सह परिवहन आयुक्त यांचेकडे सादर करावे. सदर प्रकरणी सह परिवहन आयुक्त यांनी दिलेला निर्णय बंधनकारक राहील.

४) प्राप्त अर्जामध्ये मागविण्यात आलेल्या माहितीचे विषय या कार्यालयाशी संबंधित नसल्यास असे अर्ज सहाय्यक माहिती अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरच परत पाठवावेत.

C:\My Documents\asha/PARIPATRAK

५)	प्राप्त अर्जासंबंधी अपील असल्यास / दुसऱ्या अपीलाबाबत माहिती आयुक्तांशी पत्रव्यवहार / सुनावणी आदेश तयार करावयाची कार्यवाही संबंधित कार्यासनाने संबंधित माहिती अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करावी.

उपरोक्त आदेशांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत -

१) अपर परिवहन आयुक्त / सह परिवहन आयुक्त यांना अग्रेषित.
२) परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व नियंत्रक अधिकारी.
३) परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी

सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी/मोटार वाहन निरिक्षक/
सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक विभागीय परीक्षा

परिवहन आयुक्त कार्यालय
प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

कार्यालयीन परिपत्रक क्रमांक : ३३ /संकीर्ण ४६०५/का.८(३)/वि.प./०५/जा.क्र.५०५५ दिनांक 16 APR 2005

संदर्भ - १. शासन निर्णय गृह विभाग क्र. एमव्हीओ-२४७९/२(तीन)/परि-६, दिनांक २९.४.१९८३
२. शासन निर्णय गृह विभाग क्र. एमव्हीओ-२४७९/२(एक)/परि-६, दिनांक १३.९.१९८३
३. शासन निर्णय गृह विभाग क्र. एमव्हीओ-२४८३/१४०४/परि-६, दिनांक १२.९.१९८४
४. शासन निर्णय गृह विभाग क्र. एमव्हीओ-२४७९/२(दोन)/परि-६, दिनांक १८.९.१९८४

## परिपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णयानूसार या विभागातील सहाय्यक प्रादेशिक परिहवन अधिकारी / मोटार वाहन निरिक्षक / सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक यांचेकरीता विहीत केलेल्या विभागीय परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई मार्फत सर्वसाधारणपणे वर्षामध्ये माहे जानेवारी व जुलै मध्ये घेण्यात येतात.

या परिक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांची नावे आयोगास कळविण्याकरीता त्यांचे विहीत नमून्यातील अर्ज माहे जानेवारी व जुलै मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता अनुक्रमे नोव्हेंबर व मे महिना अखेरपर्यंत कार्यालय प्रमुखांमार्फत विभाग प्रमुखांकडे सादर करावयाचे आहेत.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, परीक्षेस बसू इच्छिणारे उमेदवार चूकीच्या नमून्यातील अपूर्ण अर्ज परस्पर थेट या कार्यालयास सादर करतात. तसेच नियंत्रक अधिकारीही नियमतरतूदींची पडताळणी न करता चुकीच्या नमून्यातील अपूर्ण व परीक्षेची तारीख / परीक्षा होऊन गेल्यानंतरही अर्ज सादर करतात. काही उमेदवार परीक्षेस आयत्यावेळी अर्ज पाठवून प्रतिज्ञापत्र घेऊन थेट परीक्षेस बसतात.

सबब विभागीय परीक्षे संदर्भात खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. परीक्षार्थी उमेदवाराने जानेवारी व जुलै महिन्यांमध्ये घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेचे विहीत नमूना अर्ज अनुक्रमे नोव्हेंबर व मे महिना अखेरपर्यंत या कार्यालयास प्राप्त होतील अशा दृष्टीने कार्यालय प्रमुखांना सादर करावेत.
२. कार्यालय प्रमुख यांनी परीक्षार्थीचे अर्ज संदर्भित शासन निर्णयातील तरतूदींची पडताळणी करुन या कार्यालयास पाठवावेत.
३. उमेदवारांचे अर्ज चूकीच्या नमून्यामध्ये अपूर्ण माहिती असलेले / विहीत मार्गे सादर न केलेल्या व विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
४. काही उमेदवार परीक्षेच्या वेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेकडे प्रतिज्ञापत्र घेऊन थेट परीक्षेस बसतात. अशाप्रकारे प्रतिज्ञापत्र घेऊन परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे असे ग्राहय मानले जाणार नाही.

तरी याव्दारे सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व सदरहू परिपत्रक संबंधित उमेदवारांना निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच या परिपत्रकाची पोच दयावी.

भि. बा. कारखानीस
परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालये / सर्व सीमा तपासणी नाके कार्यालये.

C:\ganesh\aadesh\aadesh - 34

*

सेवा निवृत्त होणा-या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या तारखेस लाभ प्रदान करणे व तपशील सादर करण्याबाबत

परिवहन आयुक्त कार्यालय
प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

परिपत्रक क्रमांक : ७८ सं.४६०५/का.८(१)/सेनिलाभ/०५/जा.क्र. १८८३७ दिनांक 8 JUN 2005

संदर्भ १) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.सेनिवे-१००४/१९२/सेवा-४, दिनांक १३.८.२००४.
२) या कार्यालयाचे पत्रे क्र.पआका/का.९/सेनिलाभ/०४/जा.क्र.१५८९९, दिनांक १६.१०.२००४व जा.क्र.१७१०७, दिनांक १७.११.२००४ व जा.क्र.२०१५, दिनांक ११.२.२००५.

## परिपत्रक

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ अनुसरुन आपल्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील सेवा निवृत्त होणा-या अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या तारखेलाच सेवानिवृती लाभ (सेवा उपदान, भ.नि.नि., ग.वि.यो.,रजा रोखीकरण) प्रदान करण्याबाबत संदर्भ क्र. २ कडील पत्रान्वये वारंवार कळवूनही सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रदान केलेल्या लाभाचा तपशीलवार कार्यवाही अहवाल सादर करण्यात येत नाही असे निदर्शनास आले आहे.

याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यत या कार्यालयातील उप आयुक्त (लेखा) यांचेकडे विहीत प्रपत्रात सादर करण्याची दखल घ्यावी.

संदर्भित शासन परिपत्रक व या कार्यालयाच्या पत्रांची आपल्याकडून दखल घेण्यात आली नाही ही बाब प्रशासकीय दृष्टया गैरशिस्तीची व बेजाबाबदारपणाची आहे. तरी सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना याव्दारे सूचित करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी आपण स्वत: वैयक्तिकरित्या लक्ष घालून अपेक्षित विहीत विवरणपत्रासह अहवाल या कार्यालयातील उप आयुक्त (लेखा) विभागास दर महिण्याच्या ५ तारखेपर्यत प्राप्त होईल अशा बेताने सादर करावा.

ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी व परिपत्रकांच्या सूचनांचे काटेकोरपणाने पालन करावे. अन्यथा कार्यालय प्रमूख म्हणून आपणावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,
१. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची कार्यालये.
२. अपर /सह परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
३. उप आयुक्त (लेखा) परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई



C:\ganesh\sawant\aadesh

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
सरकारी वसाहत, बांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

कार्यालयीन आदेश क्र. २८ /संकीर्ण ४६०५/का ८(१)/ममाअ/०५/जाक्र- 12736
दिनांक ११ ऑक्टोबर २००५

वाचा : केंद्रिय माहिती अधिकार, अधिनियम २००५

## आ दे श

संदर्भाधिन अधिनियमान्वये माहितीच्या अधिकाराबाबत केंद्रिय कायदा अस्तित्वात येत असल्यामुळे शासनाने यापूर्वी दिलेल्या निर्देशान्वये " शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय माहिती अधिकारी "यांचे पदनिर्देशन अधिक्रमीत करण्यात येत असून, केंद्रिय माहितीचा कायदा २००५ कडील कलम ५ (१) (२) नवीन तरतूदीनुसार सहाय्यक माहिती अधिकारी, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रत्येक कार्यालयात पदनिर्देशित करणे आहे.

शासनाने सुचित केल्याप्रमाणे मोटार वाहन विभागातील परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई, प्रादेशिक परिवहन कार्यालय, व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात खालील अधिकारी यांचे पदनामासमोर दर्शविल्याप्रमाणे सहाय्यक माहिती अधिकारी, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून पुढील आदेश होईपर्यंत एतद्वारे नियुक्ती देण्यात येत आहे.

१) परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक माहिती अधिकारी | : | कार्यरत जनसंपर्क अधिकारी |
| माहिती अधिकारी | : | परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व उप परिवहन आयुक्त दर्जाचे अधिकारी (परिवहन उप आयुक्त-प्रशासन, अंमल-(१) (२), संगणक, प्रशिक्षण, निरिक्षण, उपआयुक्त लेखा), सहाय्यक पोलीसआयुक्त(दक्षता) |
| अपिलीय अधिकारी | : | प्रकरणपरत्वे अपिलीय अधिका-यांची नेमणूक परिवहन आयुक्तांमार्फत केली जाईल |

२) प्रादेशिक परिवहन कार्यालये

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक माहिती अधिकारी | : | कार्यरत वरिष्ठतम सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी |
| माहिती अधिकारी | : | कार्यरत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी(सर्व) |
| अपिलीय अधिकारी | : | कार्यरत प्रादेशिक परिवहन अधिकारी |

मोटार विभागातील अधिकारी / कार्यकारी अधिकारी यांचे गणवेषाबाबत.

परिवहन आयुक्त कार्यालय,
४ था मजला, प्रशासकीय इमारत,
शासकीय वसाहत, वांद्रे (पुर्व),
मुंबई-४०० ०५१

परिपत्रक क्र. ३७८ /सं.४६०५/का.८(३)/गणवेश/०५/जा.क्र. [illegible] दिनांक- 14 DEC 2005

संदर्भ : महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९

## प रि प त्र क

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, मोटार वाहन विभागातील ज्या अधिकारी / कार्यकारी अधिकारी यांना गणवेष विहीत करण्यात आला आहे. ते अधिकारी / कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम तरतूदीनुसार गणवेष परिधान करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

विभागातील सर्व अधिकारी / कार्यकारी अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम २८८ च्या (एक्स) (एफ) प्रमाणे असणाराच गणवेश परिधान करणे आवश्यक आहे.

प्रत्येक कार्यालय प्रमुखाने सदरहू बाब त्यांच्या कार्यालयातील अधिका-यांचे निदर्शनास आणून नियमाप्रमाणे गणवेश परिधान करित असल्याची खात्री करुन घेऊन तसे या कार्यालयास कळवावे.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

१) श्री. पी.व्ही.महाजन, परिवहन उप आयुक्त (संगणक), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना त्यांचे दिनांक २७.९.२००५ चे टिपणीस अनूसरुन माहितीकरिता.

२) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना योग्य कार्यवाहीसाठी

३) अपर / सह परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी

४) परिवहन उप आयुक्त (प्रशासन)/अंमल-१/अंमल-२/प्रशि/निरि, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

५) नोंदवही.

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

C:\SSJadhav/Sawant madam

शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा
जास्तीत जास्त वापर करण्याबाबत

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय**
४ था मजला, प्रशासकीय इमारत,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

परिपत्रक क्रमांक : ३८/संकीर्ण-४६०६/का.८(५)/म.भाषा वापर/०६/जा.क्र. ६७००, दिनांक - 8 MAY 2006

संदर्भ : भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमां मभावा-११/२००५/१३१/२८४८/मंप्रग, दिनांक २३.१२.२००५

## परिपत्रक

उपरोक्त विषयास अनुसरुन भाषा उप संचालक यांनी दैनंदिन कामकाजात राजभाषा मराठीचा वापर कितपत होतो याकरिता या कार्यालयातील कामाची तपशीलवार तपासणी केली असता, मराठी भाषेतील कामाचे ८० टक्के तर इंग्रजी भाषेतील कामाचे २० टक्के प्रमाण असल्याचे त्यांना दिसून आले आहे. सबब त्यांनी याबाबत तपासणी अहवालात खालील बाबींची पूर्तता करण्याबाबत सूचविले आहे.

१. कार्यालयातील दैनंदिन हजेरीपटामध्ये कर्मचाऱ्यांची नावे मराठी उच्चाराप्रमाणे लिहावीत व स्वाक्षरीही मराठीत करावी, समयोत्तर हजेरी पटामध्येही कर्मचाऱ्यांनी आपली नावे मराठी उच्चाराप्रमाणे लिहून उशिरा येणाचे कारण मराठीत लिहावे व स्वाक्षरी मराठीत करावी.
२. कार्यालयातील प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस लावण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या नामाचे फलक तसेच अधिकाऱ्यांचे दालनावरील त्यांचे नामफलक मराठी उच्चाराप्रमाणे लिहिण्यात यावीत.
३. शासन व अन्य कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर अधिकाऱ्यांनी इंग्रजी ऐवजी मराठीतून सूचना दयाव्यात.
४. वरिष्ठता सूचीमध्ये कर्मचाऱ्यांची नावे मराठी उच्चाराप्रमाणे लिहून त्यावर अधिकाऱ्यांनी मराठी स्वाक्षरी करावी.
५. विभागीय परीक्षा व अन्य आवेदन पत्रांचे नमूने मराठीत करुन घ्यावेत व त्याचा वापर करावा. तसेच इंग्रजीभाषेत असलेल्या नियम पुस्तिकेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन ते मराठी अनुवादासाठी भाषा संचालक, मुंबई यांचेकडे पाठवावीत.
६. पॉलिसी मॅटर व अन्य संदर्भातील टिपण्या इंग्रजी ऐवजी मराठी भाषेत कराव्यात.
७. कार्यालयातील जे रबरी शिक्के इंग्रजीत आहेत ते मराठीत बनवून घ्यावेत व त्यांचा वापर करावा.
८. आवक - जावक नोंदवहीतील अनुक्रमांक इंग्रजी ऐवजी मराठीत लिहावेत. तसेच इंग्रजीतून आलेल्या पत्रांच्या नोंद इंग्रजी उच्चाराप्रमाणे देवनागरीत घेण्यात याव्यात.
९. कर्मचाऱ्यांची वेतन व अन्य देयकांमध्ये नावे मराठी उच्चाराप्रमाणे लिहावीत. देयके मराठीत करण्यात यावीत. सर्व अग्रिमाचे / प्रमाणपत्रांचे इंग्रजीत असलेले नमूने मराठीत तयार करुन त्यांचा वापर करावा.

तसेच इंग्रजीतून आलेल्या देयकांच्या नोंदी इंग्रजी ऐवजी इंग्रजी उच्चाराप्रमाणे देवनागरीत घेण्यात याव्यात. उप आयुक्त / लेखा अधिकारी / संबंधित लिपिक यांनी देयकांवर व आदेशांवर मराठीतून स्वाक्षरी करावी. देयकासंदर्भातील नोंदवहीतील नोंदी मराठीतून घेण्यात याव्यात. सेवापुस्तकामध्ये घेण्यात येणाऱ्या नोंदी मराठीत घेण्यात याव्यात.

पावती पुस्तके मराठीत तयार करुन घ्यावीत व मराठीत भरण्यात यावीत. रोखपालाने पावती पुस्तकावर मराठीत स्वाक्षरी करावी व रोखपुस्तकातील नोंदीही मराठीत घ्याव्यात.

कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली मराठी / हिंदी भाषा परीक्षा सूट कोणत्या कारणास्तव व कोणत्या नियमान्वये देण्यात आली आहे त्याचा स्पष्ट उल्लेख सेवा पुस्तकामध्ये करावा.

काही कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकामध्ये मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण अशी नोंद आहे परंतु हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट दिल्याची नोंद नाही. (उदा. श्री.डी.पी. गोंदरकर व दे.शा.साळुंखे, कनिष्ठ लिपिक) अशी किती प्रकरणे आहेत या करीता कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांची सेवा पुस्तके पडताळणी करुन अहवाल सादर करावा.

तसेच कर्मचाऱ्यांना मराठी / हिंदी भाषा परीक्षा सूट दिल्याच्या नोंदी सेवापुस्तकाध्ये घेण्यात आल्या आहेत. परंतू संबंधितांचा माध्यमिक शालान्त परीक्षेस मराठी भाषा विषय उच्चस्तर होता किंवा कसे याची नोंद नाही. (उदा. श्रीमती फिरके, कनिष्ठ लिपिक) बहुतेक अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकांमध्ये याबाबत मोघम नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. (उदा. श्री. शि. वि. ठाकूर, सह परिवहन आयुक्त, श्री. स. बा. सहस्त्रबुध्दे, परिवहन उप आयुक्त, श्री. शे. कि. पाचरणे, परिवहन उप आयुक्त)

अनुकंपा तत्वावर लिपिक - टंकलेखक पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी नियुक्ती दिनांकापासून २ वर्षात मराठी टंकलेखनाचे विहीत वेग मर्यादा शासकीय वाणीज्य प्रमाणपत्र कार्यालयास सादर केले आहे किंवा नाही याची पडताळणी करावी व असे प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात आणाव्यात.

याबाबत नमूद करण्यात येते की, शासन व्यवहारा राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करण्यासंबंधात शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश विचारात घेऊन या कार्यालयाच्या कामकाजातील वर्जित प्रयोजने वगळता १०० टक्के मराठीचा वापर होण्याकरिता सूचित करण्यात येते की, सर्व नियंत्रक अधिकारी / कार्यासन अधिकारी यांनी सदरहू परिपत्रकाची नोंद घेऊन संबंधित मुद्दयांवर आपले स्तरावर कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल सादर करावा. जेणेकरुन भाषा संचालक, मुंबई यांना अहवाल सादर करणे सोयीचे होईल.

स. बा. सहस्त्रबुध्दे

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व नियंत्रक अधिकारी / कार्यासन अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई

२. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी.

प्रति,
परिवहन
प्र.प. प्रादे.

अभियांत्रिकी पदवीधारक, पदवीकाधारक व अभियांत्रिकी अर्हतारहित सहायक मोटार वाहन निरिक्षक व मोटार वाहन निरिक्षक यांना राजपत्रित दर्जा देणेबाबत.

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एमव्हीडी- १२०८/प्र.क्र. १७२/परि-४, (१)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १४ नोव्हेंबर, २००८.

**प्रस्तावना :-** शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या पदवीधर कनिष्ठ अभियंत्याना तसेच यापुढे शासनसेवेत कनिष्ठ अभियंत्यांच्या पदावर भरती होणा-या पदवीधारकांना राजपत्रित अधिका-यांचा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता त्याचप्रमाणे निर्धारीत सेवा काळ, शर्ती पूर्ण करणा-या पदवीकाधारक व अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांनासुध्दा राजपत्रित दर्जा देण्याबाबत शासन निर्णय पाटबंधारे विभाग (आताचा जलसंपदा विभाग) दिनांक १६ एप्रिल, १९८४ अन्वये पदवीधर व अन्य कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याबाबत धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला. याच आधारावर शासनाकडील इतर विभागातील अभियांत्रिकी अर्हता धारण केलेल्या अधिकाऱ्यांना देखील सुधारीत उच्च वेतनश्रेणी व राजपत्रित दर्जा वेळोवेळी शासनाने प्रदान केला. मात्र मोटार वाहन विभागातील समान शैक्षणिक अर्हता असलेल्या आणि धारण केलल्या विविध पदावरील अभियांत्रिकी व तत्सम अर्हता धारण केलेल्या अधिका-यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे वेतनश्रेणी व दर्जा अद्याप बहाल केलेला नव्हता. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन निरीक्षक यांना वेतनश्रेणी व राजपत्रीत दर्जा लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

***शासन निर्णय*** :- मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन निरीक्षक यांना राजपत्रीत दर्जा लागू करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे ठेवण्यात आला होता. त्यावर मंत्रीमंडळाने दि.५/११/२००८ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी अधिकाऱ्यांप्रमाणे मोटार वाहन विभागातील अभियांत्रिकी व तत्सम अर्हता असलेल्या अधिकाऱ्यांना राजपत्रित दर्जा लागू करण्यास मान्यता दिली. मोटार वाहन विभागात पदवीधारक,

पदवीकाधारक व अभियांत्रिकी अर्हतारहित सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील अधिकाऱ्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झाल्यानंतर त्यांना रु.५५००-१७५-९००० अशी वेतन श्रेणी दि.१ डिसेंबर, २००८ पासून लागू करण्यास व विशिष्ट सेवा काळ पूर्ण केलेल्या सहायक मोटार वाहन निरिक्षकांना राजपत्रित दर्जा देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक सेवाकाळ पूर्ण केलेल्या सहायक मोटार वाहन निरिक्षकास राजपत्रित दर्जा देवून त्यांना सहायक मोटार वाहन निरिक्षक (वरीष्ठ श्रेणी) असे संबोधण्यात यावे व त्यांना रु. ६५००-२००-१०५०० अशी वेतन श्रेणी लागू करण्यात यावी.

| **सहायक मोटार वाहन निरिक्षकांची वर्गवारी** | **राजपत्रित दर्जा मिळण्यास आवश्यक सेवाकाळ** |
|---|---|
| अ) पदवीधारक | नेमणूकीपासून |
| ब) ३ वर्षाची पदविका धारण केलेले | ५ वर्षे |
| क) २ वर्षाची पदविका किंवा तत्सम पदविका धारण केलेले | ७ वर्षे |
| ड) अर्हतारहित सहायक मोटार वाहन निरिक्षक | १० वर्षे |

३. सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदास वरीलप्रमाणे राजपत्रित दर्जा 'गट-ब' देण्यात आल्याने मोटार वाहन निरीक्षक या संवर्गास सुध्दा राजपत्रित दर्जा 'गट-अ (कनिष्ठ स्तर)' देण्यात येत आहे.

४. सदर आदेशानुसार सहायक मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन निरीक्षक यांच्या सेवा प्रवेश नियमात यथावकाश दुरुस्ती करण्यात येईल व सुधारीत सेवा प्रवेश नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेनंतर राजपत्रात अधिसूचित करण्यात येतील. उपरोक्त सुधारणा या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

हे आदेश वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.- प्र.क्र.३५१/ व्यय-८, दि.३/१०/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सेकेतांक क्र. २००८१११५१०५४०१००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रमानाथ झा)
शासनाचे प्रधान सचिव

प्रति,

महालेखापाल, १/२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई/सर्व मंत्रालयीन विभाग

पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई/पोलिस आयुक्त बृहन्मुंबई
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
सर्व पोलिस आयुक्त/सर्व पोलिस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
सर्व उप/प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती (गृह विभाग /परि-४)

४

**परिवहन विभागातील गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील अधिकाऱ्यांना सुधारीत <u>वेतनश्रेणी लागू करणेबाबत.</u>**

## *महाराष्ट्र शासन*
## *गृह विभाग*

शासन निर्णय क्रमांक :- एमव्हीडी- १२०८/प्र.क्र. १७२/परि-४, (२)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १४ नोव्हेंबर, २००८.

**वाचा :-** शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक :- एमव्हीडी- १२०८/प्र.क्र. १७२/परि-४, (१), दि.१४ नोव्हेंबर, २००८

**<u>प्रस्तावना :-</u>** मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन निरीक्षक ही पदे आणि अभियांत्रिकी पदवीधारक/ पदविकाधारक व अभियांत्रिकी अर्हतारहित असलेल्या जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करून मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन निरीक्षक यांना वेतनश्रेणी व राजपत्रीत दर्जा लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार मोटार वाहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक व त्यावरील गट-अ व गट-ब वर्गातील अधिकाऱ्यांना आणि अर्हता प्राप्त गट-क मधील सहायक मोटार वाहन निरीक्षक यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

***<u>शासन निर्णय</u>*** :- मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक ते अपर परिवहन आयुक्त यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे ठेवण्यात आला होता. त्यावर मंत्रीमडळाने दि.५/११/२००८ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी अधिकाऱ्यांप्रमाणे मोटार वाहन विभागातील वर नमूद केलेल्या सहायक मोटार वाहन निरीक्षक ते अपर परिवहन आयुक्त या पदावरील अधिकारी हे अभियांत्रिकी व तत्सम अर्हता धारण करीत असल्याने अशा अधिकाऱ्यांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी दि.१ डिसेंबर, २००८ पासून लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | पदाचे नाव | सध्याची वेतनश्रेणी (रुपये) | सुधारीत वेतनश्रेणी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | सहायक मोटार वाहन निरीक्षक | ५०००-१७५-९००० | ५५००-१७५-९००० |
| २ | सहायक मोटार वाहन निरीक्षक (वरिष्ठ श्रेणी) | -- | ६५००-२००-१०५०० |
| ३ | मोटार वाहन निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ७४५०-२२५-११०५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी | ६५००-२००-१०५०० | ८०००-२७५-१३५०० |
| ५ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी | ७४५०-२२५-११५०० | १००००-३२५-१५२०० |
| ६ | प्रादेशिक परिवहन अधिकारी | १००००-३२५-१५२०० | १२०००-३७५-१६५०० |
| ७ | परिवहन उप आयुक्त (वरिष्ठ श्रेणी) | १०६५०-३२५-१५८५० | १४३००-४००-१८३०० |
| ८ | परिवहन सह आयुक्त | १२०००-३७५-१६५०० | १५१००-४००-१८३०० |
| ९ | अपर परिवहन आयुक्त | १४३००-४००-१८३०० | १६४००-४५०-२०००० |

हे आदेश वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.- प्र.क्र.३५१/ व्यय-८, दि.३/१०/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सेकेतांक क्र. २००८१११५११००१४००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रमानाथ झा)**
**शासनाचे प्रधान सचिव**

प्रति,

महालेखापाल, १/२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई/सर्व मंत्रालयीन विभाग
पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई/पोलिस आयुक्त बृहन्मुंबई
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
सर्व पोलिस आयुक्त/सर्व पोलिस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
सर्व उप/प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती (गृह विभाग /परि-४)

मोटार वाहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक यांना राजपत्रित गट-अ, (कनिष्ठ स्तर) पदाचा दर्जा देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

शासन निर्णय क्र.एमव्हीडी १२०९/प्र.क्र.३३(१)/परि-४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २० फेब्रुवारी, २००९

वाचा :- शासन निर्णय क्र.एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२(१)/परि-४, दि.१४.११.२००८

**शासन निर्णय :-** मोटार वाहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना दि.१.१२.२००८ पासून रु.७४५०-२२५-११०५० ही राजपत्रित अधिकाऱ्यांना लागू असलेली वेतनश्रेणी मंजूर करण्याचा तसेच त्यांना राजपत्रित गट-अ (कनिष्ठ स्तर) दर्जा देण्याचा धोरणात्मक निर्णय संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेतला आहे.

२. त्यानुसार मोटार वाहन निरीक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना दि.१.१२.२००८ पासून राजपत्रित, गट-अ (कनिष्ठ स्तर) दर्जा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सदर संवर्गातील अधिका-यांना यापुढे **"राजपत्रित, गट-अ (कनिष्ठ स्तर)"** असे घोषित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००९०२२०१६०७४८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्र. चं. मयेकर )
शासनाचे अवर सचिव

प्रत :- महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सर्व पोलीस आयुक्त/सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सर्व संबंधित मोटार वाहन निरीक्षक,
(परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
निवडनस्ती, परि४

---

71\D:\2008\02

रोटा/एच-३१०६[ए][६००-३-०९].

*

<u>राजपत्रित अधिकाऱ्यांना रजा मंजूर करणेबाबत.</u>
अधिकाराचे प्रत्यार्पण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कार्यालयीन आदेश क्रमांक -एमव्हीडी १२०९/प्र.क्र.२२०/परि-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- ३० जून २००८.

## कार्यालयीन आदेश

अभियांत्रिकी पदविधारक, पदविकाधारक व अभियांत्रिकी अर्हता रहित सहायक मोटार वाहन निरीक्षक यांना राजपत्रित गट-ब पदाचा दर्जा व मोटार वाहन निरीक्षक यांना गट-अ (कनिष्ठ स्तर) यांना दि.१.१२.२००८ पासून राजपत्रित दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे राजपत्रित अधिकाऱ्यांच्या १८० दिवसापर्यंतच्या रजा मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख या नात्याने परिवहन आयुक्त कार्यालयात वर्ग झाले आहेत. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, मोटार वाहन निरीक्षक व सहायक मोटार वाहन निरीक्षक यांची सेवापुस्तके प्रादेशिक परिवहन कार्यालय व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात असल्याने त्यांची १८० दिवसापर्यंतची रजा मंजूर करण्याचे अधिकार "शासकीय बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियमातील प्रकरण-३ मधील कलम-९ नुसार" कार्यालयीन कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्याकरिता विभाग प्रमुखांना असलेले अधिकार प्रादेशिक विभाग प्रमुख या नात्याने प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना प्रत्यार्पित करण्यात येत आहेत.

(प्र. चं. पयकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत :- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. १/२
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
अधिदान व लेखा अधिकारी. मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
निवडनस्ती. परि-४

D:\2009\Letter.lwp

*

राजपत्रित अधिकाऱ्यांना रजा मंजूर करणेबाबत.
अधिकाराचे प्रत्यार्पण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन शुध्दीपत्र क्रमांक -एमव्हीडी १२०९/प्र.क्र.२२०/परि-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १ ऑगस्ट, २००९.

वाचा :- कार्यालयीन आदेश समक्रमांक, दि.३०.६.२००८

**शासन शुध्दीपत्रक** :- संदर्भाधीन कार्यालयीन आदेशाचा दि.३० जून, २००८ ऐवजी दि.३० जून, २००९ असा वाचण्यात यावा. तसेच सदर कार्यालयीन आदेशातील दहा ते बारा या ओळीमध्ये "विभाग प्रमुखांना असलेले अधिकार प्रादेशिक विभाग प्रमुख या नात्याने प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना प्रत्यार्पीत करण्यात येत आहेत." या ऐवजी "विभाग प्रमुखांना असलेले अधिकार प्रादेशिक विभाग प्रमुख या नात्याने प्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा स्तरावरील कार्यालय प्रमुख या नात्याने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना प्रत्यार्पीत करण्यात येत आहेत." असे वाचण्यात यावे.

(शि. ना. मानेकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत :- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर, १/२
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
निवडनस्ती, परि-४



E:\Letter.lwp

४

अभियांत्रिकी पदवीधारक, पदविकाधारक व अभियांत्रिक अर्हतारहित सहायक मोटार वाहन निरीक्षक यांना राजपत्रित, गट-ब पदाचा दर्जा देणेबाबत.

## *महाराष्ट्र शासन*
## *गृह विभाग*

शासन निर्णय क्र.एमव्हीडी १२०९/प्र.क्र.३३(२)/परि-४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २० फेब्रुवारी, २००९

वाचा :- शासन निर्णय क्र.एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२(१)/परि-४, दि.१४.११.२००८

***शासन निर्णय :-*** मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक या संवर्गात कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे धारण केलेली अर्हता व आवश्यक सेवाकाळ पूर्ण करणा-या सहायक मोटार वाहन निरीक्षकांस "राजपत्रित, गट-ब" दर्जा देऊन त्यांना रु.६५००-२००-१०५०० अशी वेतनश्रेणी लागू करण्याचा तसेच सहायक मोटार वाहन निरीक्षक (वरिष्ठश्रेणी) असे संबोधण्यात यावे असा धोरणात्मक निर्णय शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेतला आहे.

| सहायक मोटार वाहन निरीक्षकांची वर्गवारी | राजपत्रित दर्जा मिळण्यास आवश्यक सेवाकाल |
|---|---|
| अ) पदवीकाधारक | नेमणूकीपासून |
| ब) ३वर्षाची पदविका धारण केलेले | ५ वर्ष |
| क) २ वर्षाची पदविका किंवा तत्सम पदविका धारण केलेले | ७ वर्षे |
| ड) अर्हतारहित सहायक मोटार वाहन निरीक्षक | १० वर्षे |

२. त्यानुसार सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांपैकी दिनांक १.१२.२००८ रोजी ज्या अधिकाऱ्यानी वरील प्रमाणे अर्हता धारण केलेली आहे व आवश्यक सेवाकाळ पूर्ण केला आहे अशा "प्रपत्र-अ" मध्ये दर्शविलेल्या अधिकाऱ्यांना खाली नमूद केल्याप्रमाणे "राजपत्रित, गट-ब", दर्जा देण्यात येत आहे.

१) ज्या सहायक मोटार वाहन निरीक्षकांनी नेमणूकीच्या दिनांकापासून अभियांत्रिकी पदवी प्रमाणपत्र धारण केले आहे अशा अधिकाऱ्यांना दि. १.१२.२००८ पासून व त्यानंतर नियुक्त होणा-या सहायक मोटार वाहन निरिक्षकांना नियुक्तीच्या दिनांकापासून,

२) ज्या सहायक मोटार वाहन निरीक्षकांनी नेमणूकीच्या दिनांकापासून ३ वर्षाची अभियांत्रिकी पदवीका धारण केली आहे व सदर संवर्गामध्ये सलगपणे दि. १.१२.२००८ रोजी किंवा त्यापूर्वी ५ वर्षाची सेवा पूर्ण करणा-या अधिकाऱ्यांना दि. १.१२.२००८ पासून,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सर्व पोलीस आयुक्त/सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, (परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
सर्व संबंधित मोटार वाहन निरीक्षक, मोटार वाहन विभाग, (परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
निवडनस्ती, परि४

नव निर्मित लातूर प्रादेशिक परिवहन विभागातील प्रादेशिक स्तरावरील गट 'क' ची रिक्त पदे भरण्यासाठी व लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांची निवडसूची बनविण्यासाठी व पुनर्विलोकन करण्यासाठी निवड समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एमव्हीडी -१२०९/प्र.क्र-१४२/परि-३

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२, दिनांक : ३० जुलै, २००९.

वाचा :- १) शा.नि.सा.प्र.वि.क्र.आरएसबी १०८२/सीआर-१८/भाग-२-तेरा-अ दि.१८.०६.१९८३

२) शा.नि.सा.प्र.वि.क्र.प्रनिमं-३०९९/५५५/प्र.क्र.६९/९९/१३-अ दि.१.७.१९९९

३) शा.नि.गृह विभाग.क्र.एमव्हीडी-१२०५/सीआर-४६८/परि-४ दि.२.७.२००८

४) परिवहन आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र.क्र. पआका/का.८ अ/नांदेड/निवड समिती/०९/जा.क्र.५९२८, दिनांक ३.६.२००९.

शासन निर्णय :- मोटार वाहन विभागातील नवनिर्मित प्रादेशिक परिवहन विभागातील गट 'क' ची रिक्त पदे भरण्यासाठी निवड समिती गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता वरील संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये प्रादेशिक परिवहन विभाग, नांदेड या प्रादेशिक परिवहन विभागाचे विभाजन करुन प्रादेशिक परिवहन विभाग, लातूर असा नविन प्रादेशिक विभाग निर्माण करण्यात आला आहे.या संदर्भात वरील संदर्भांकित शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निदेशानुसार मोटार वाहन विभागातील नवनिर्मित लातूर या प्रादेशिक परिवहन विभागातील गट 'क' ची प्रादेशिक स्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी व प्रादेशिक विभागातील लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांची निवडसूची बनविण्यासाठी व पुनर्विलोकन करण्यासाठी या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ) प्रादेशिक स्तरावरील गट-क ची रिक्त पदे भरण्यासाठी निवड समिती-

१) प्रादेशिक परिवहन विभाग लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | परिवहन आयुक्त | अध्यक्ष |
| २ | प्रादेशिक परिवहन अधिकारी,लातूर | सदस्य सचिव |
| ३ | लेखा अधिकारी,प्रादेशिक परिवहन कार्यालय,लातूर | सदस्य |
| ४ | विभागीय समाज कल्याण सेवा योजना अधिकारी,लातूर | सदस्य |
| ५ | अतिरिक्त आदिवासी आयुक्त,लातूर अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |

ब) प्रादेशिक विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची निवड सूची बनविण्यासाठी व पुर्नविलोकन करण्यासाठी निवड समितीची स्थापना-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक परिवहन अधिकारी (संबधित विभागाचे) | अध्यक्ष. |
| २ | जेष्ठतम उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (संबधित विभागाचे) | सदस्य |
| ३ | विभागीय समाज कल्याण अधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी | सदस्य |
| ४ | संबंधित प्रादेशिक परिवहन विभागाचे प्रशासकीय अधिकारी/लेखा अधिकारी | सदस्य सचिव |

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सु. ज्ञा. रेंडेकर )
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति :

१) सचिव, रोजगार व स्वयंरोजगार
२) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, कोकण भवन, नवी मुंबई.
४) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १३ अ/कार्यासन १६ ब)
५) प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सर्व परिवहन विभाग.
६) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर.
७) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
९) सर्व विभागीय समाजकल्याण/सेवायोजन अधिकारी.
१०) निवड नस्ती/परि-३

★

१७५६

क्र :रजा ०१/का ८(५)/अधि.प्रत्या./२००९/जाक्र
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ४ था मजला,**
**शासकीय वसाहत, बांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१**
**दिनांक :** 25 AUG 2009

**प्रति,**
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

**विषय** : राजपत्रित अधिका-यांना रजा मंजूर करणेबाबत.
अधिकाराचे प्रत्यार्पण करणेबाबत.

**संदर्भ** : १. शासन आदेश क्र.एमव्हीडी-१२०९/प्र.क्र.२२०/परि-४ दि.३० जून २००९
२. शासन शुध्दीपत्रक क्र.एमव्हीडी-१२०९/प्र.क्र.२२०/परि-४
दिनांक १ ऑगस्ट २००९

वरील विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भाधिन शासन आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

आपणांस सुचित करण्यांत येते की, उपरोक्त शासन आदेशाप्रमाणे सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, मोटार वाहन निरिक्षक व सहा.मोटार वाहन निरिक्षक यांचे रजा प्रकरणी उचित कार्यवाही करण्यांत यावी.

सहपत्र : शासन आदेशाची व
शुध्दीपत्रकाची प्रत

**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**